नियमित दिवाणी दावा क्र. ५३५/२०१८

नि.क्र. ३८

## निशाणी क्र. ३८ खालील आदेश

विनाकैफियत आदेश रद्द करण्यासाठी प्रस्तुतचा अर्ज दाखल केला आहे.

२. अर्जातील संक्षिप्त कथन असे की, वकीलांच्या कुटुंबातील व वकीलांच्या आजारपणामुळे ९० दिवसाचे आत कैफियत दाखल करता आले नाही. सबब कैफियत दाखल करण्यासाठी झालेला विलंब माफ करावा असे अर्जदाराने विनंती केली.

३. वादीतर्फे प्रस्तुत अर्जास सदर अर्ज नामंजुर करावा असे सांगितले. अर्जातील मजकु हा दिशाभुल करणारा तसेच अर्जातील कारण संयुक्तीक नसुन, कोणतेही कायदेशीर कारण घडलेले नसल्याचे सांगुन वादीला त्रास व्हावा यामुळे जाणुनबुजून प्रस्तुत अर्ज दिल्याचे सांगितले.

४. अर्ज व त्यावरील म्हणणे पाहिले. उभयपक्षांचे म्हणणे ऐकले.

५. निर्णयासाठी निर्माण होणारे मुद्दे व त्यावरील निष्कर्ष खालील प्रमाणेः

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | कैफियत दाखल करणेस झालेला विलंब माफ होण्यास पात्र आहे काय ? | 'होय' |
| २. | आदेश काय ? | अंतिम आदेशाप्रमाणे |

६. वकीलांच्या कुटूंबातील व वकीलांच्या आजारपणामुळे कैफियत दाखल करण्यास विलंब झाल्याचे प्रतिवादी क्र. १ चे म्हणणे आहे. सोबत शपथपत्र दिले आहे. वकीलांबाबत दिलेले कारण संयुक्तीक नाही. असे असले तरी वरील बाबींना अनुसरुन अर्ज नामंजुर केल्यास प्रतिवादी क्र. १ चे नुकसान होईल. कारण सदर प्रकरण स्थावर

Digitally signed by Bhausaheb Changdeo More
Date: 2020.01.04 17:38:18 +0530

मिळकती संदर्भात आहे. त्यामुळे दाव्याचे योग्य व पुढील निर्णयासाठी या प्रतिवादीला बाजु मांडण्याचे संधी देणे आवश्यक आहे. त्याने केलेल्या विलंबाबाबत दंड आकारुन अर्ज मंजुर करणे जास्त न्यायाचे होईल. सबब वरील मुद्दयाचा निष्कर्ष होकारार्थी नोंदवुन पुढील आदेश पारीत करण्यात येतो.

**<u>आदेश</u>**

१. अर्ज मंजुर करण्यात येतो.
२. प्रतिवादी क्र. १ ने ५००/– रुपये न्यायालयात भरावी.
३. सदर रक्कम सरकार जमा करण्यात यावी.

न्यायालयात घोषीत करण्यात आले.

Digitally signed by Bhausaheb Changdeo More
Date: 2020.01.04 17:38:26 +0530

( बी.सी. मोरे )

दि. ०४.०१.२०२०.

५ वे सह दिवाणी न्यायाधीश, व. स्तर,
सोलापूर.

**CERTIFICATE**

I affirm that the contents of this PDF file Judgment/Order are same word to word as per the original Judgment/Order.

| | | |
|---|---|---|
| Name of the Stenographer | - | A.B. Sandrok |
| Court | - | 5th Jt. CJSD & ACJM, Solapur. |
| Date of Judgment/Order | - | 04.01.2020. |
| Judgment/Order signed by the Presiding Officer on | - | 04.01.2020. |
| Judgment/Order uploaded on | - | 04.01.2020. |